# वैद्यकिय, अभियांत्रिकी प्रवेशपूर्व परिक्षा वर्गाचा लाभ घ्या-डॉ.खताळ



**उर्जा वृत्तसेवा**

देगलूर - महाविद्यालयात वैद्यकिय व अभियांत्रिकीच्या प्रवेशपूर्व मार्गदर्शन वर्गास प्रारंभ. शहरातील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर तर्फे ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेची तयारीसाठी कोटा राजस्थान येथील तज्ञ प्राध्यापकांच्या म ार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून दिली आहे.तरी विद्यार्थ्यांनी याचा विशेष असा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले. ते देगलूर महाविद्यालयात दिनांक १० जून पासून वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेची संपूर्ण तयारी करून घेण्याकरिता मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्गासाठी कोटा (राजस्थान) येथील तज्ञ प्रा.जे.पी.चंद्रा ,रवी कुमार पाल तसेच प्रणेश कुमार गौतम, मुकेश सर यांना पाचारण करण्यात आले आहे. त्यांनी प्रत्यक्ष वर्ग घेण्यास महाविद्यालयात सुरू केले आहेत त्यांचा या निमित्ताने सत्कार समारंभ आज घेण्यात आला. यावेळी अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. खताळ सर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य उत्तम कुमार कांबळे कोटा(राजस्थान) येथील मा.चंद्रा सर रवी कुमार पाल, प्रणेश कुमार गौतम आणि मुकेश सर यांची उपस्थिती होती. यानंतर रवी कुमार पाल यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व शिक्षणा मागची भूमि का आणि अभ्यासाचे तंत्र याविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या वर्गासाठी प्रवेश घ्यावा असे आवाहन केले. तसेच सत्कार समारंभाच्या मार्गदर्शन प्रसंगी उपप्राचार्य उत्तम कुमार कांबळे यांनी ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी देगलूर महाविद्यालयाने नांदेड ;लातूर व इतर ठिकाणी न जाता विद्यार्थ्यांनी आपल्या शहरांमध्ये वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेच्या तयारीसाठी देगलूर महाविद्यालयाने सोय करून दिली आहे पुढील जीवनात यशस्वी होण्यासाठी या वर्गासाठी प्रवेश घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पर्यवेक्षक प्रा.संग्राम पाटील यांनी मानले या कार्यक्रम ासाठी बहुसंख्य विद्यार्थी तसेच प्रा.डॉ.व्ही.जी शेरीकर,प्रा.गजानन कोकडवार प्रा. हनुमंत वाकडे प्रा.भुसाळे राजेन्द्र प्रा.दासरवाड प्रा.तुकाराम लागले प्रा.महेश कुलकर्णी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner